## वार्ता टिपण ता. ३०/०८/२०१८

## घरफोडी चोरीच्या सराईत गुन्हेगाराकडून २० घरफोडीचे गुन्हे उघडकीस व ११ लाख रुपयांचा माल हस्तगत

पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार नामे निखील कंगणे हा अनेक दिवसांपासुन फरार असल्याची व त्याने त्याच्या साथीदारांच्या मदतीने घरफोड्या केल्या असल्याची माहीती मिळाली.

मिळालेल्या माहीतीनुसार खंडणी विरोधी पथकाचे अधिकारी व कर्मचारी वरील गुन्हेगारांचा शोध घेत असताना पोलीस कर्मचारी अमोल पिलाने यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की वरील गुन्हेगार नामे निखील ऊर्फ मॉन्टी कंगणे रा.तळेगांव ढमढेरे पुणे हा त्याच्या साथीदारासह हडपसर गावात गांधीचौकाजवळ सोन्याच्या दुकानात चोरीचे सोने विक्रीसाठी येणार आहे. अशी माहीती मिळाल्याने सदर माहीतीच्या अनुशंगाने खंडणी विरोधी पथक गुन्हेशाखा पुणे चे अधिकारी व कर्मचारी यांनी गांधीचौक हडपसर पुणे येथे सापळा रचुन आरोपी नामे १) निखील ऊर्फ मॉंटी दत्तात्रय कंगणे वय २४ वर्षे व्यवसाय काहीनाही रा.सी/ओ संदीप राऊत यांचे घर,आनंदनगर,तळेगांव ढमढेरे,ता.शिरुर, जि. पुणे २) अमोल रघुनाथ गोपकर वय २८ वर्षे धंदा मजुरी रा.भिमशक्तीनगर स्पाईनरोड,चिखली पुणे यांना पकडले. व त्यांना हडपसर पो.स्टे गु.र.नं.११३८/१७ भादवि कलम ४५७,३८० या गुन्हयात दि. २६/०८/२०१८ रोजी १७/०० वा.अटक केली आहे.

वर नमुद आरोपींची मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो लष्कर न्यायालय पुणे यांनी दि.३०/०८/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे. सदर पोलीस कस्टडी रीमांडच्या कालावधीत नमुद आरोपींकडे विश्वासात घेवुन तपास करता, पैकी आरोपी नामे निखील ऊर्फ मॉंटी दत्तात्रय कंगणे याने त्याच्या साथीदारांसह पुणे शहरातील हडपसर पोस्टे,चंदननगर, येरवडा, विमानतळ वानवडी,फरासखाना,सहकारनगर,सिंहगडरोड,वारजेमाळवाडी तसेच निगडी पोस्टेच्या हद्दीतील एकुण २० घरफोड्या चो-या केल्याचे निष्पन्न झाले असुन, त्याच्याकडुन सुमारे ११ लाख रुपये किंमतीचे वेगवेगळ्या डिझाईनचे सोन्या-चांदीचे दागीने जप्त करण्यात आले असुन सदरचे २० गुन्हे उघडकीस आले आहे.

सदरची कारवाई ही गुन्हे शाखेचे सहा. पोलीस आयुक्त श्री.समीर शेख सो यांच्यासह खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री.रघुनाथ जाधव, पोलीस उपनिरीक्षक राहुल घुगे, पोलीस कर्मचारी अविनाश मराठे, पांडुरंग वांजळे, रमेश गरुड, उदय काळभोर, एकनाथ खंदारे, महेश कदम, मनोज शिंदे, प्रदीप शिंदे, संतोष मते, सचिन कोकरे, धिरज भोर, मंगेश पवार, फिरोज बागवान, शिवानंद बोले, हनुमंत गायकवाड,नारायण बनकर,प्रकाश मगर यांनी केली आहे.


गुन्हे शाखा, पुणे शहर